# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर

वाचले:-१) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(१) (२) व (३).
२) मुख्य ब्रिज अभियंता, पश्चिमरेल्वे, चर्चगेट, मुंबई यांचेकडील पत्र No/W६५/२०/५२५ दि.०४/०६/२०१६.
३) भारतीय रेल्वे कायदा १९८९ चे कलम २०.
४) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३० व ३४.
५) मुंबई उच्च न्यायालय यांचेकडील याचिका क्र.२७/२०११.
६) महाराष्ट्र फेरीज ॲण्ड इन्लॅण्ड व्हेसल्र्स ॲक्ट १८६८.
७) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ कलम २०.

क्र/गृह/कक्ष १/टे.४/मनाईआदेश/एस.आर.-६१/२० दिनांक३१/१२/२०२०

आदेश

ज्याअर्थी भारतीय रेल्वे कायदा १९८९ चे कलम २० मध्ये Notwithstanding anything contained in any other law, the Central Government may, if it is of the opinion that any work undertaken or may be undertaken, is likely to alter or impede the natural course of water flow or cause an increase in the volume of such flow endeangering any cutting, embankment or other work on a railway, issue directions in writing to any person, officer or authority responsible for such work to close, regulate or prohibit that work, अशी तरतुद केली आहे.

ज्याअर्थी उपोद्घातातील अनुक्रमांक २ वर अंतर्भूत असलेल्या पत्रान्वये मुख्य ब्रिज अभियंता, पश्चिम रेल्वे, चर्चगेट, मुंबई यांनी असे निदर्शनास आणून दिले आहे की, रेल्वे ब्रिज क्र. ९३ च्या कार्यक्षेत्रामध्ये व त्यांच्या पोहोच मार्गामधील रेती उत्खनन व नौकानयन मार्ग वाहतुकीसाठी बंद करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी उपोद्घातातील अनुक्रमांक २ वर अंतर्भुत असलेल्या पत्रान्वये मुख्य ब्रिज अभियंता यांनी पश्चिम रेल्वेवरील सदर ब्रिज बाबतचे महत्त्व व रेल्वे ब्रिज बाबतचा संभाव्य धोका उदभवल्यास होणारे परीणाम या बाबत कळविले आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २० अन्वये सर्व सार्वजनिक रस्ते, गल्ल्या आणि मार्ग, पुल, खंदक, धरणे आणि त्यांच्या वरील किंवा त्यांच्या बाजूंची कुंपणे आणि पुर्ण भरतीच्या पाण्याच्या खुणेच्या खालील समुद्राचा, बंदराचा व खाडयांचा आणि नदया, ओहोळ, नाले, सरोवर व तळी यांचा तळ आणि सर्व कालवे व पाण्याचे पाट आणि साचलेले सर्व पाणी व वाहते पाणी ईत्यादी वर राज्य शासनाचा मालकी हक्क आहे.

ज्या अर्थी मुंबई उच्च न्यायालयाकडील पीआयएल क्र.२७/२०११ मधील दि.०३/१०/२०११ च्या आदेशान्वये रेल्वे ब्रिज क्र.९३ च्या क्षेत्रातील रोडचा वापर रेती वाहतुक ट्रकसाठी प्रतिबंधित केला आहे.

ज्याअर्थी जिल्हाधिकारी पालघर यांचेकडील अर्धशासकीय पत्र क्र.अ.शा.प.क्र.रेतीगट/गौख/कावि-४२९/१६ दि.०५/०८/२०१६ अन्वये पोलिस अधीक्षक पालघर यांना वैतरणा नदीवरील रेल्वे ब्रिज व इतर ब्रिजच्या ६०० मीटर कार्यक्षेत्रात २४X७ पोलिस गस्त ठेवण्याच्या सुचना दिल्या आहेत.

ज्याअर्थी शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/०५१२/प्र.क्र.३००/ख दि.१२/०३/२०१३ व शासन निर्णय क्र.गौखनि-१०/१०१४/ प्र.क्र.५००/ख दि.२१/०५/२०१५ अन्वये पुलाच्या दोन्ही बाजूस ६०० मीटर (२००० फुट) च्या क्षेत्रात रेती उत्खननास परवानगी देणेत येत नाही.

ज्याअर्थी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांना राष्ट्रीय व्यवस्थापन प्राधिकारणाचे अध्यक्ष म्हणून एखादी संभाव्य आपत्ती टाळण्यासाठी कलम ३० व ३४ अन्वये निर्देश देण्याचे अधिकार आहेत.

ज्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये उपद्रवाच्या किंवा आशंकित संकटाच्या अशा तातडीच्या प्रकरणात आदेश काढण्याचा जो अधिकार आहे. त्यातील कलम (१) अन्वये जेथे जिल्हादंडाधिकाऱ्याला, उप विभागीय दंडाधिकाऱ्याच्या किंवा राज्य शासनाने या संबंधात खास अधिकार प्रदान केलेल्या अन्य कोणत्याही कार्यकारी दंडाधिकाऱ्याच्या मते

पार्श्वनाथ ९, बिडको नाका, जिल्हा पालघर. पिन कोड - ४०१ ४०४
संपर्क क्र. ०२५२५ - २५३१११ ▪ ई-मेल : collector.palghar-mh@gov.in ▪ वेबसाईट : palghar.gov.in

या कलमाखाली कार्यवाही करण्यास पुरेसे कारण असेल आणि तात्काळ प्रतिबंध करणे किंवा सत्वर उपाययोजना इष्ट असेल त्या प्रकरणी एखाद्या व्यक्तीला विवक्षित कृती करण्यापासून परावृत्त राहण्याचा अथवा तिच्या कब्जातील किंवा तिच्या व्यवस्थापनाखालील विवक्षित मालमत्तेबाबत विवक्षित बंदोबस्त करण्याचा निर्देश दिल्यास कायदेशिरपणे नेमलेल्या व्यक्तीस अडथळा, त्रास किंवा क्षती पोहोचण्यास अथवा मानवजिवीताला, आरोग्याला किंवा सुरक्षिततेला संकट उत्पन्न होण्यास अथवा सार्वजनिक प्रशांतता बिघडण्यास अथवा दंग्यास किंवा दंगलीस त्यामुळे प्रतिबंध होण्याचा संभव आहे किंवा प्रतिबंध होण्याला ते उपकारक आहे असे अशा दंडाधिकाऱ्याला वाटले तर, असा दंडाधिकारी त्या प्रकरणाच्या महत्त्वाच्या तथ्यांचे निवेदन अंतर्भुत असलेला एक लेखी आदेश काढून व कलम १३४ मध्ये उपबंधित केलेल्या रितीने तो बजावून त्याव्दारे तसा निदेश देऊ शकेल.

(२) आणीबाणीच्या प्रसंगी किंवा जिच्या विरुध्द आदेश काढलेला असेल त्या व्यक्तीवर योग्य अवधीत नोटीस बजावणे परिस्थितीमुळे शक्य नसेल अशा प्रकरणात, या कलमाखाली आदेश एकतर्फी देता येईल.

(३) या कलमाखालील आदेश विशिष्ट व्यक्तीला अथवा विशिष्ट स्थळी किंवा क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तींना, अथवा एखाद्या विशिष्ट स्थळी किंवा क्षेत्रात राबता असणाऱ्या किंवा तेथे प्रसंगवशात येणाऱ्या सर्वसाधारण जनतेला उद्देशून काढता येईल, अशा ज्या तरतुदी नमुद आहेत.

त्याअर्थी, मी **डॉ.किरण महाजन, अपर जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(१) (२) व (३) आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३० व ३४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन वैतरणा नदीवरील रेल्वेपुलाच्या (पुल क्र.९३) दोन्ही बाजूस ६०० मीटर कार्यक्षेत्रात **दि.०४/०१/२०२१ रोजी ००.०१ वा.पासून ते दि.०३/०३/२०२१ रोजी २४.०० वाजेपर्यंतच्या** कालावधीत पोलीस विभाग, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, नौदल, मत्स्य व्यवसाय, वन, कोस्ट गार्ड, उत्पादन शुल्क इत्यादी शासकीय विभाग वगळून इतर सर्व व्यक्तींना वैतरणा नदीवरील रेल्वेपुलाच्या (पुल क्र.९३) दोन्ही बाजूस ६०० मीटर अंतरात जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पालघर यांचे पुर्व परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारे नौकानयन मार्गाचा वापर करणेस मनाई आदेश लागू करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक ३१/१२/२०२० रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-XXX**
(डॉ.किरण महाजन)
**अपर जिल्हादंडाधिकारी पालघर**

**प्रत :-** मा.अध्यक्ष, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
**प्रत :-** मा.अपर मुख्य सचिव, गृहविभाग(विशेष) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
**प्रत :-** मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
**प्रत :-** मा.डायरेक्टर जनरल, कोस्ट गार्ड रिजनल हेडक्वार्टर (पश्चिम) वरळी, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
**प्रत:-** मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषीत.
**प्रत:-** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषीत.
**प्रत :-** पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार यांना माहितीसाठी तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.
**प्रत:-** पोलीस अधीक्षक,पालघर यांचेकडे जरूर त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषीत.
**प्रत :-** मुख्य ब्रिज अभियंता, पश्चिम रेल्वे, चर्चगेट, मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषीत.
**प्रत:-** उपवनसंरक्षक, वन विभाग, डहाणू/ठाणे यांचेकडे माहिती व कार्यवाहीसाठी.
**प्रत :-** उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय,पालघर यांचेकडे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
**प्रत :-** कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
**प्रत :-** सहा आयुक्त, मत्स व्यवसाय, पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
**प्रत :-** अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
**प्रत :-** व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई यांचेकडे राजपत्रात प्रसिध्दीसाठी.
**प्रत :-** जिल्हा माहिती अधिकारी, पालघर यांचेकडे वृत्तपत्रात बातमी म्हणून प्रसिध्दीसाठी रवाना.

अपर जिल्हादंडाधिकारी पालघर
सत्यमेव जयते
जिल्हा पालघर

(डॉ.किरण महाजन)
**अपर जिल्हादंडाधिकारी पालघर**